मातोश्री वृध्दाश्रमांना अनुदान तत्वावर आणण्याबाबत

# महाराष्ट्र शासन

**सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,**
**शासन निर्णय क्रमांक : जेष्ठना-२०१६/प्र.क्र.१८/सामासू**
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : ६ मार्च ,२०१९.

वाचा - १) शासन निर्णय,सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्र. संकीर्ण-१०९५ /प्र.क्र.१६० /सुधार-२ दि. १७ नोव्हेंबर,१९९५
२) शासन निर्णय,सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्र. ओएएच-२००१ /प्र.क्र.२८८/सुधार १, दि. ३ डिसेंबर,२००१
३) आयुक्त,समाजकल्याण,पुणे यांचे पत्र क्रमांक सकआ/ मावक/ मातोश्रीवृध्दा / माहिती /२०१६-१७/का.१२/४७३, दि.२८/७/२०१६
४) शासन निर्णय,सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्र. बीसीएच-२०१८ /प्र.क्र.३३८/ शिक्षण -२, दि. ३ मार्च,२०१९

प्रस्तावना -

वृध्दापकाळ चांगल्या प्रकारे घालविता यावा याकरीता वृध्दांसाठी सर्वसाधारण वृध्दाश्रम ही योजना स्वयंसेवी संस्थेमार्फत अनुदानित तत्वावर शासनामार्फत राबविण्यात येत आहे. सदर योजनेशिवाय वृध्दांना काही अधिक सोयी-सुविधा ,सवलती उपलब्ध करुन देण्यासाठी " रमाधाम" वृध्दाश्रम त्यामध्ये निवासाच्या सोयीशिवाय बाग-बगीचा ,वाचनालय, दूरदर्शन,बैठे खेळ इ.सोयींचा समावेश असलेला सुसज्ज वृध्दाश्रम स्वयंसेवी संस्थेमार्फत अनुदान तत्वावर सुरु करण्याचा निर्णय घेवुन मातोश्री वृध्दाश्रम योजनेस शासनाच्या संदर्भाधिन क्रमांक १ येथील दिनांक १७/११/१९९५ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. राज्यात एकूण ३१ मातोश्री वृध्दाश्रम असून त्यातील ८ वृध्दाश्रम बंद आहेत व २३ वृध्दाश्रम सद्यस्थितीत चालू आहेत. सन २००१ मध्ये मातोश्री वृध्दाश्रमाचा आढावा घेतल्यानंतर राज्यातील सर्व मातोश्री वृध्दाश्रम खाजगी स्वयंसेवी संस्थांमार्फत कायमस्वरुपी व कोणतेही शासन अनुदान न देता चालू ठेवण्याचा निर्णय शासनाच्या संदर्भाधिन क्रमांक २ येथील दिनांक ३/१२/२००१ च्या शासन निर्णयामधील अटी व शर्तीच्या अधीन राहून घेण्यात आला आहे.

मातोश्री वृध्दाश्रम योजनेअंतर्गत स्वयंसेवी संस्थांना इमारत बांधकामासाठी ५ एकर विनामूल्य जमीन व रु. ५०.०० लक्ष इमारत बांधकामासाठी अनुदान प्रत्येक वृध्दाश्रमास उपलब्ध करुन देण्यात आलेले होते. याशिवाय अनावर्ती खर्चापोटी रु. ३.९४ लक्ष इतके अनुदान उपलब्ध करुन देण्यात आलेले होते. प्रत्येक वृध्दाश्रमाची मान्य संख्या १०० इतकी असून दिनांक ३० मार्च, १९९९ च्या शासन निर्णयान्वये ज्या वृध्दांचे वार्षिक उत्पन्न रु. १२,०००/- च्या वर आहे. त्यांचेकडून रु. ५००/- दरमहा शुल्क आकारण्यात येते. तर कमी उत्पन्न असणा-या वृध्दास कोणतेही शुल्क आकारण्यात येत नाही. मातोश्री वृध्दाश्रमामध्ये सर्व सोयीसुविधा उपलब्ध करुन देण्यात येतात.

ज्येष्ठ नागरिकांच्या समस्या निवारण्यांमध्ये स्वयंसेवी संस्थांना सततचा सहभाग अत्यंत मोलाचा आहे. तसेच चॅरिटेबल ट्रस्ट, धार्मिक /इतर संस्था यांना सेवा पुरविण्याचे कार्यक्षेत्र विस्तृत करण्यासाठी त्यांना प्रोत्साहन देणे आवश्यक आहे. शासनाच्या संदर्भाधिन क्रमांक ४ येथील दिनांक ३ मार्च, २०१९ च्या शासन निर्णयान्वये स्वयंसेवी संस्थामार्फत चालविण्यात येत असलेल्या अनुदानित संस्थामध्ये अनुदानित सर्व साधारण वृध्दाश्रमातील प्रवेशीतांना देण्यात येणारे दरडोई परिरक्षण (परिपोषण) अनुदान दरमहा रु. १५००/- इतके करण्यात आले आहे. सदर सर्वसाधारण वृध्दाश्रमाप्रमाणे विविध लोकप्रतिनिधी व संघटना यांच्या सततच्या मागणीनुसार सुरु असलेल्या २३ मातोश्री वृध्दाश्रमांना अनुदान तत्वावर आणण्याचा प्रस्ताव दिनांक ५/३/२०१९ रोजीच्या मा. मंत्रीमंडळाच्या बैठकीमध्ये सादर करण्यात आला असता, त्यास मा.मंत्रीमंडळाने मान्यता दिलेली आहे. त्यानुषंगाने याबाबत शासन निर्णय निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

मा. मंत्रीमंडळाने दिनांक ५/०३/२०१९ रोजीच्या बैठकीत मान्यता दिल्यानुसार महाराष्ट्र राज्यातील कार्यान्वित असलेल्या परिशिष्ट अ मध्ये दर्शविल्यानुसार २३ मातोश्री वृध्दाश्रमांना अनुदान तत्त्वावर आणण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

२. मातोश्री वृध्दाश्रमातील वृध्दांना परिपोषण अनुदान रु. १५००/- दरडोई दरमहा मंजूर करण्यात येत आहे. परिपोषण अनुदानासाठी एकूण रु. ४.१४ कोटी इतक्या वार्षिक खर्चास शासन मान्यता देण्यात येत आहे.

३. २३ मातोश्री वृध्दाश्रमासाठी परिशिष्ट-ब मध्ये दर्शविल्यानुसार प्रत्येकी १४ याप्रमाणे एकूण ३२२ मानधनावरील पदे निर्माण करण्यास ; सदर पदांना उच्चस्तरीय समितीची मान्यता घेण्यात येईल, या अटीच्या अधीन राहून मान्यता देण्यात येत आहे. या ३२२ कर्मचा-यांच्या मानधनासाठी वार्षिक एकूण रु २,१५,२८,०००/- इतक्या खर्चासही शासन मान्यता देण्यात येत आहे.

४. याप्रमाणे एकूण वार्षिक रु. ६,२९,२८,०००/- इतक्या खर्चास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

५. अनुदान वितरीत करतांना वृध्दाश्रम सुरु असल्याची खात्री करण्यात यावी. तसेच अनुदान मंजूर करतांना मान्य वृध्दांची कमाल मर्यादा १०० असली तरी प्रवेशित वृध्दांची संख्या विचारात घेवून अनुदान मंजूर करण्यात यावे.

६. मातोश्री वृध्दाश्रमासाठीच्या अटी व शर्ती स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येतील.

७. सदरचा खर्च खालील लेखाशिर्षातून भागविण्यात यावा.

अ. मागणी क्रमांक एन-३, २२३५,सामाजिक सुरक्षा व कल्याण, १०४,वृध्द,विकलांग व निरश्रीत व्यक्तींचे कल्याण, (०३) वृध्द व विकलांग व निरश्रीत व्यक्तींच्या गृहे, (०३)(०१) वृध्द व अपंगांसाठी गृहे, (२२३५ १४३२) ३१,सहाय्यक अनुदाने (वेतनेत्तर)

ब. मागणी क्रमांक एन-३, २२३५,सामाजिक सुरक्षा व कल्याण ,१०४,वृध्द,विकलांग व निरश्रीत व्यक्तींचे कल्याण,पंचवार्षिक योजनेतंर्गत योजना- राज्य योजनांतर्गत योजना (०७)जिल्हा परिषदांना अनुदान, (०७)(०१) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती

अधिनियम,१९६१ याच्या कलम १८७ अन्वये वृध्द व अपगांसाठी गृहे योजनेकरीता अनुदाने, ( २२३५ २७९८ ) , ३१,सहाय्यक अनुदाने (वेतनेत्तर)

क. मागणी क्रमांक एन-३, २२३५,सामाजिक सुरक्षा व कल्याण ,१०४,वृध्द,विकलांग व निरश्रीत व्यक्तींचे कल्याण,पंचवार्षिक योजनेतंर्गत योजना- राज्य योजनांतर्गत योजना (०७)जिल्हा परिषदांना अनुदान, (०७)(०१) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम,१९६१ याच्या कलम ८७ अन्वये वृध्द व अपगांसाठी गृहे योजनेकरीता अनुदाने,( २२३५ २७८९ ) , ३१,सहाय्यक अनुदाने (वेतनेत्तर)

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक क्र. २०१९०३१०१७४९४१९३२२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने

DINGLE DINESH RAMCHANDRA

Digitally signed by DINGLE DINESH RAMCHANDRA
DN: c=IN, st=Maharashtra,
2.5.4.20=8612f2011cf8cde3b074d561cd711c17c6c3fd836467a8648a8d21dc84bc01be, postalCode=400032, street=151 ANNEX,1ST FLOOR,MANTRALAYA,MUMBAI,
serialNumber=fc344849650ce07c3f9adc7e2cd4976b2852065e2acd65f7cee1828c10091458, ou=SOCIAL JUSTICE AND SPECIAL JUSTICE DEPT,
o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=DINGLE DINESH RAMCHANDRA
Date: 2019.03.10 17:54:56 +05'30'

( दि. रा. डिंगळे )

सह सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रति,**

१. मा. राज्यपाल यांचे सचिव
२. मा. मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मुंबई
३. मा. मंत्री यांचे खाजगी सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
४. मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
५. मुख्य सचिव यांचे खाजगी सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
६. सर्व अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव / सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
७. सर्व जिल्हाधिकारी,
८. आयुक्त, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य पुणे.
९. सर्व विभागीय आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय.
१०.सर्व प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण
११.सर्व सहायक आयुक्त, समाज कल्याण विभाग.
१२.सर्व जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद
१३.निवड नस्ती, सामासु.

# परिशिष्ट -अ

## सुरू असलेल्या मातोश्री वृध्दाश्रमांची यादी (२३)

| क्र | जिल्हा | वृध्दाश्रमाचे नांव व पत्ता. | मान्यसंख्या |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | ठाणे | जीवन संध्या मांगल्य सोसायटी, जिल्हा ठाणे | १०० |
| २ | मुंबई शहर | वसंत स्मृती संस्था, बोरिवली )गोराई जवळ (जिल्हा मुंबई शहर | १०० |
| ३ | रत्नागिरी | शिवतेज आरोग्य सेवा संस्था मौ.आंबये, ता.खेड, जिल्हा रत्नागिरी | १०० |
| ४ | सिंधुदूर्ग | शिक्षण प्रसारक मंडळ, कणकवली, जिल्हा सिंधूदुर्ग | १०० |
| ५ | पुणे | राजर्षी शिवराय प्रतिष्ठान मातोश्री वृध्दाश्रम हिंगणे, कर्वेनगर, पुणे | १०० |
| ६ | सातारा | ज्योर्तीमयी स्वयंसेवी संस्था, सदरबाजार, जिल्हा सातारा | १०० |
| ७ | कोल्हापूर | सिधाई महिला मंडळ ट्रस्ट संचलित मातोश्री वृध्दाश्रम, कोल्हापूर | १०० |
| ८ | नाशिक | थोरल्या मासाहेब जिजाई संस्था, सामनगाव, जिल्हा नाशिक | १०० |
| ९ | धुळे | डॉ.ए.के.दुग्गल संचलित मातोश्री वृध्दाश्रम, धुळे | १०० |
| १० | जळगाव | जनता सहकारी बँक लि. केशव स्मृती प्रतिष्ठान संचलित मातोश्री वृध्दाश्रम, सावरखेडा, जळगाव | १०० |
| ११ | अहमदनगर | नेताजी सुभाष चंद्रबोस तरुण मंडळ, अहमदनगर | १०० |
| १२ | अमरावती | प्रविण खोडके ममोरिअल ट्रस्ट, अमरावती | १०० |
| १३ | अकोला | गुरुदत्त शिक्षण प्रसारक संस्था, कोलखेड, जिल्हा अकोला | १०० |
| १४ | यवतमाळ | संस्कृती संवर्धक मंडळ संचलित मातोश्री वृध्दाश्रम, निळोणा, यवतमाळ | १०० |
| १५ | लातूर | मानव विकास प्रतिष्ठान, मानव विकास संस्था, जिल्हा लातूर | १०० |
| १६ | नागपूर | भारतीय अदिमजाती सेवक संघ, विदर्भ, जिल्हा नागपूर | १०० |
| १७ | वर्धा | मातृसेवा संघ, शाखा वर्धा सिंधीनेघे, जिल्हा वर्धा | १०० |
| १८ | गोंदिया | विद्या अलंकार एज्युकेशन सोसायटी, गोंदिया | १०० |
| १९ | चंद्रपूर-१ | भारतीय समाज सेवा संघ, भिवकुंड, जिल्हा चंद्रपूर | १०० |
| २० | गडचिरोली | आदर्श शिक्षण प्रसारक मंडळ, चार्मोशी रोड, गडचिरोली | १०० |
| २१ | औरंगाबाद | जिवनबाई तापडिया चॅरिटेबल ट्रस्ट, नक्षत्रवाडी, औरंगाबाद | १०० |
| २२ | बीड | वसुंधरा प्रतिष्ठान व संशोधन संस्था, अंबाजोगाई, जिल्हा बीड | १०० |
| २३ | परभणी | शिवसेना बहुउद्देशीय प्रतिष्ठान मातोश्री वृध्दाश्रम असोला, जिल्हा परभणी | १०० |
| | | एकूण | २३०० |

# परिशिष्ट-ब

| अ.क्र. | पदाचे नाव | मानधन | कर्मचारी संख्या | २३ मातोश्री वृध्दाश्रमांसाठी एकूण कर्मचारी संख्या | मानधन १२ महिन्याकरीता |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | अधिक्षक | ८००० | १ | २३ | २२,०८,००० |
| २ | वैद्यकीय अधिकारी (अर्धवेळ) | ८००० | १ | २३ | ११,०४,००० |
| ३ | परिचारीका | ७००० | १ | २३ | १९,३२,००० |
| ४ | कनिष्ठ लिपिक | ७००० | १ | २३ | १९,३२,००० |
| ५ | काळजीवाहक | ५००० | ४ | ९२ | ५५,२०,००० |
| ६ | स्वयंपाकी | ६००० | २ | ४६ | ३३,१२,००० |
| ७ | स्वयंपाकी मदतनिस | ५००० | २ | ४६ | २७,६०,००० |
| ८ | शिपाई | ५००० | १ | २३ | १३,८०,००० |
| ९ | पहारेकरी | ५००० | १ | २३ | १३,८०,००० |
| | एकूण | | १४ | ३२२ | २,१५,२८,००० |